महाराष्ट्र शासन
धर्मादाय सह आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय पुणे विभाग पुणे
45-2, वाडिया कॉलेज जवळ, कै.बाळकृष्ण सखाराम ढोले पाटील मार्ग, पुणे
फोन नं. 020-26162728
e-Mail Id- supdtest.pu-mh@gov.in

5025/26
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग पुणे वाडीया कॉलेज समोर,
४५-२, कै. बाळकृष्ण सखाराम ढोले
पाटील मार्ग, पुणे - १
दि. - 03.09.26

प्रती,

मा.धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- वाहनचालक पदाची निवीदा संकेतस्थळावर प्रसिध्द करणे बाबत.

मा. महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, या कार्यालयातील कंत्राटी वाहनचालक या पदाची मुदत दि.३०/०९/२०२६ रोजी संपत असल्यामुळे निविदा पदधतीने कंत्राटी वाहनचालक या पदाची प्रकिया राबविण्यासाठीचा ठराव दि.०१/०९/२०२६ रोजी "कंत्राटी पदे भरतीसाठी निर्णय घेणारी समिती" चे बैठकीत मंजुर झालेला आहे. त्यानुसार सदर पदाची निविदा सुचना आपले https://charity.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी ही नम्र विनंती.

येणे प्रमाणे सविनय सादर.

आपला विश्वासु

(दिनेश ए. कोठलीकर)
धर्मादाय सह आयुक्त
पुणे विभाग पुणे

सोबत – निविदा सुचना.

जा. क्र./ 5024/26
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग पुणे वाडीया कॉलेज समोर,
४५-२, कै. बाळकृष्ण सखाराम ढोले
पाटील मार्ग, पुणे - १
दि. - 03.09.26

## निविदा सूचना

**विषय :- वाहनचालक पदाची कामे बाह्य यंत्रणेद्वारे (Outsourcing) करुन घेणेबाबत.**

मा. धर्मादाय सह आयुक्त, तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे या कार्यालयात वाहनचालक पदाचे खाली दर्शविलेल्या रिक्त जागेच्या गोषवाऱ्याप्रमाणे एक वर्षाच्या कंत्राट कालावधी करीता सेवा पुरविण्यासाठी नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार कंपनी /संस्थेकडून प्रत्यक्षरीत्या निविदा दि.०९/०९/२०२६ रोजी ०५:०० वाजे पर्यंत वरील नमूद पत्यावर मागविण्यात येत आहे निविदा लिफाफयावर वाहनचालक असे नमूद करणे आवश्यक आहे. सदर निविदा दि.१०/०९/२०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वा. समिती समोर उघडण्यात येतील.

सदरची निविदा https://charity.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

निविदा मागविणाऱ्या कार्यालयाचे नाव - मा. धर्मादाय सह आयुक्त, तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कायलिय, पुणे विभाग, पुणे.

**कामाचे स्वरुप** :- धर्मादाय सह आयुक्त पुणे विभाग, पुणे कार्यालयात बाह्य यंत्रणेद्वारे (Outsourcing) बाहनचालक पदांची सेवा उपलब्ध करुन देणे. बाहनचालक पदावर बाह्य यंत्रणेद्वारे खालीलप्रमाणे कामाचे स्वरुप राहील.

1. मा. धर्मादाय सह आयुक्त, तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे येथे असलेल्या चार चाकी (Light Motor Vehicle) वाहनातून अधिकारी निवास स्थानापासून ते मा. धर्मादाय सह आयुक्त, तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे येथे अधिकाऱ्यांची ने-आण करणे.

2. अधिकाऱ्यांच्या बाहेरगावी दौऱ्या दरम्यान तसेच, मंत्रालय येथे अधिकाऱ्यांची ने-आण करणे.

३. वाहने स्वच्छ व सुस्थितीत ठेवणे.

४. वरिष्ठांच्या आदेशानुसार कामकाज करणे.

वरील प्रमाणे कामाचे स्वरुप बाह्य यंत्रणेद्वारे भरण्यात आलेल्या वाहनचालक यांचे कडून करुन घेण्यात येईल.

**निविदा क्रमांक** –

कंत्राटदाराच्या संस्थेचे/ कंपनीचे संपूर्ण नाव

कंत्राटदाराच्या संस्थेचे/कंपनीचे संपूर्ण पत्ता – कंत्राटदाराच्या संस्थेचे/कंपनीचा संपर्क दूरध्वनी –

कंत्राटदाराच्या संस्थेचे कंपनीचा नोंदणी क्रमांक –

कंत्राटदाराच्या संस्थेचे/कंपनीचा सेवा कर क्रमांक-

| अ.क्र | कार्यालयाचे नाव | आवश्यक असलेल्या वाहनचालक पदावरील कर्मचारी संख्या | मागणी केलेल्या वाहनचालक पदासाठी सेवा पुरविण्यासाठी कंत्राटदाराने मागणी केलेली रक्कम(प्रति महिना)/प्रति व्यक्ती | सेवा कर | एकूण रक्कम (रुपये) (स्तंभ ४+५) | एकूण रक्कम अक्षरी (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ |
| ०१ | धर्मादाय सह आयुक्त,पुणे विभाग पुणे तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय ,पुणे | ०१ | | | | |

वरील तक्त्यात अ.क्र.४ ते ७ हया स्तंभातील माहिती कंत्राटदाराने भरावयाची आहे.

**निविदा प्रक्रिया:**

संपूर्ण निविदा प्रक्रीया प्रत्यक्षरीत्या निविदा असून ती तांत्रिक निविदा लखोटा Technical Bid Envelop (B-1) व आर्थिक निविदा लखोटा (Financial Bid Envelop (B2) अशा दोन लखोटा पध्दतीत राहील.

**अ) तांत्रिक निविदा:**

अ) निविदाकाराने वाहनचालक यांची सेवा केंद्रधराज्य शासन वा इतर अन्य आस्थापनांमध्ये पुरविली असल्यास याबाबतचे संबंधित कार्यालयाचे जारी केलेले कार्यादेश आणि कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करावे.

ब) कंपनीचेध्संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र

क) प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्र,

ड) ई.पी.एफ. (Employees Provident fund) नोंदणी प्रमाणपत्र

ई) आयकर विभागाने जारी केलेले पॅन कार्ड (PAN CARD)

उ) सेवा कर (Service Tax) नोंदणी प्रमाणपत्र

ऊ) मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र

ए) निबिदेसोबत जोडलेले सर्व कागदपत्रे साक्षांकित असणे आवश्यक आहे

ऐ) निविदा अटी व शर्तीसह निविदाकाराची सही, शिक्का

वर नमूद केलेली सर्व कागदपत्रे वर दिलेल्या क्रमानेच सादर करण्यात यावी. तसेच उपरोक्त नमूद केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर करण्यात याव्यात, कंत्राटदाराने निविदा अर्जासोबत सदर प्रमाणपत्रे सादर न केल्यास, निविदा अर्ज निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल

सर्व प्रथम तांत्रिक निविदा उघडण्यात येईल. तांत्रिक निविदा उघडताना निविदाकार अथवा त्याचे प्रतिनिधी हजर राहणे आवश्यक आहे व त्यावेळेस त्यांनी प्रमाणपत्राच्या मूळ प्रती पडताळणीसाठी हजर ठेवणे आवश्यक आहे. जर निविदाकार तांत्रिक निविदेमध्ये नमूद केलेल्या बाबीची पुर्तता करीत नसेल तर त्याची निविदा अपात्र ठरविण्यात येईल व सदर निविदाकारांची निविदा पुढील कार्यवाहीसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही पात्र ठरणाऱ्या निविदाकारांचीच अथिक निविदा उघडण्यात येईल. आंथिक निविदेमधील रक्कम तात्रिक निविदेमध्ये नमूद करण्यात येऊ नये जर तसे आढळल्यास संबंधित निविदाराची निविदा बाद ठरविण्यात येईल

**ब) आर्थिक निविदाः-**

निविदेचे दर हे दरपत्रक (BOK) यामध्ये सर्व करासहीत नमुद करावेत. आंथिक निविदेमध्ये निविदाकाराने नमूद केलेले दर निविदेमधील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करीत असेल, तर पुढील कार्यवाहीसाठी निविदा ग्राह्य धरण्यात येईल निविदा स्वीकारण्याचा अधिकार या कामासाठी नियुक्ती केलेल्या निवड समितीला असतील व कोणतेही कारण न देता एक किवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार सदर समितीला असेल.

**<u>सर्वसाधारण अटी व शर्तीः</u>**

१. कंत्राटदाराने कार्यालयाचे कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगाराना किमान वेतन कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले, तर सबधीत कंत्राटदारांवर किमान वेतन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्याचे कंत्राट तात्काळ रद्द करुन त्याचे नाव काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

२ कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना कामाचे वेतन व त्या अनुषंगीक इतर सर्व भत्ते रोख स्वरुपात अदा न करता संबंधीत कंत्राटी कामगाराच्या नावाने रेखाकीत धनादेशाव्दारेच (Account Payee cross cheque) अदा करावेत

३. कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला दिलेल्या धनादेशाची (Cheque) छायांकीत प्रत, सदर धनादेश स्विकारल्याची कत्राटी कामगाराची स्वाक्षरी असलेले वेतन देयक ज्यावर सदर धनादेश

क्रमांक लिहीलेला असेल, कत्राटदाराने दरमहा सबंधित कार्यालयास सादर करावे लागतील. जोपयंत कंत्राटदार वरील कागदपत्रे सादर करणार नाहीत, तोपयंत त्या महिन्याचे कत्राटदाराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

४. कंत्राटाचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत एक वर्षापेक्षा जास्त राहणार नाही.

५. आवश्यकता भासल्यास त्याचे ऐवजी दुसरा कामगार उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल

६. सुट्टीच्या दिवशी कंत्राटी कामगाराकडून काम करुन घेतल्यास त्या दिवसाची बदली रजा देण्यात यावी. मात्र अशी बदली रजा देताना त्यादिवशी कार्यालयातील कामकाजाचा खोळंबा होवू नये म्हणून दुसऱ्याकामगाराची सोय करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

७ शासकीय कामाचे वेळेनतर कंत्राटी कामगारांना जास्तीचे शासकीय काम करावे लागल्यास त्यांना अतिकालीन भत्ता देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीक भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल

८ कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कार्यालयास हजर होताना व कार्यालय सोडताना बायोमेट्रीक प्रणालीवर अगर हजेरी पटाबर त्यांची उपस्थिती नोंदविणे बंधनकारक असेल सदर नोंदणीसाठी होणारा संपूर्ण खर्च कंत्राटदाराने उचलावयाचा आहे.

९. कंत्राटदारास त्यांनी नेमलेल्या कंत्राटी वाहनचालक कामगार यांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतूदीनुसार वेतन, इतर सवलती व सेवा शर्ती लागू करणे बंधनकारक असेल

१०. ज्या कंपनीस / संस्थेस वाहनचालक या पदाचे सेवा घेणेबाबत काम सोपविण्यात येईल त्यानी त्या बाबतच्या अटी व शर्ती नुसार करार करणे आवश्यक राहील

११. कंपनी/संस्थेतर्फे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायीत्व शासनावर किवा कार्यालयावर राहणार नाही.

१२. सदरील निविदेस शासनाकडून प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर ती अंमलात येईल.

१३. कंत्राटदारामार्फत दिल्या जाणाऱ्या वरील सेवा/सुविधा इत्यादीबाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणेबंधनकारक राहील.

१४. कार्यालयास कंत्राटी पध्दतीवर पुरविण्यात येणाऱ्या सोई-सुविधा / काम यांचेसाठी जी कंत्राटी सेवा कंत्राटदारामार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने लागू असणारे सर्व कर कंत्राटदाराने अदा करावेत.

१५. कंत्राटदार संस्था/कंपनी यांनी कंत्राटी सेवा उपलब्ध करुन देताना शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, क्र. पदन २५१२/प्र.क्र. १५७/का.१२ दि. २७.०१.२०१५ व शासन निर्णय, विधि व न्याय विभाग के. कंत्राटी २०१६/प्र.क्र. १९४/का.१२ दि. २३.०२.२०१७ मधील निदेशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१६. उपरोक्त कामासाठी कंत्राटदारामार्फत ज्यांना काम देण्यात येणार आहे. त्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे नियम व अटी व शर्ती लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगिक लाभ अनुज्ञेय / लागू राहणार नाही. त्यांचा सेवा कालावधी किवा कर्तव्य कालावधी व मानधनाबाबत हे कार्यालय कसल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

१७. नियुक्ती प्राधिकाऱ्यांने सुचविलेली सर्व कामे तसेच आयत्यावेळी कामाचे स्वरुप बदलल्यास त्याप्रमाणे, कंत्राटदार संस्थान कंपनी यांनी कामे करुन देणेचे त्यांचेवर बंधनकारक राहील. त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकुण घेतली जाणार नाही.

१८. कंत्राटदाराने कंत्राटी कामगार पुरवितांना बाल कामगारांचा समावेश होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

१९. कंत्राटदारास कंत्राटी कामाचा मोबदला अदा करताना त्यातून नियमाप्रमाणे आयकर कापून घेणेत येईल.

२०. कंत्राटी कामगारांनी कार्यालयात काम करताना त्यांच्या नजरेस ज्या काही बाबी येतील, त्या कार्यालयीन बाची आहेत याची जाणीव ठेवून त्यासबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवणे, तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याची दक्षता घेणे, या बाबी कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

२१. कंत्राटदारामार्फत नेमलेल्या कंत्राटी कामगारांकडून सरकारी मालमत्तेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास, नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदार यांना देय असलेल्या रक्कमेतून वसूल करणेत येईल.

२२. केवळ निविदा भरली म्हणून कंत्राटावर हक्क सांगता येणार नाही

२३. कंत्राटदारास कंत्राटाचे संबंधात कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२४. कंत्राटदारास पूर्वीचे कामाचा अनुभव असल्यास त्याने निविदेसोबत अनुभवाचे प्रमाणपत्र हजर करणे आवश्यक राहील.

२५. कंत्राटदाराने नियुक्त कामगारांना सामाजिक सुरेक्षेअंतर्गत फायदे, तसेच इ. पी. एफ. आणि एम.पी. ॲक्ट, १९५२ अंतर्गत असलेले फायदे देणे बंधनकारक राहील.

२६. निविदे सोबत जोडलेले सर्व कागदपत्र साक्षांकित असावेत.

२७. निविदा धारकास अस्तित्वात असलेल्या अनुषंगिक सर्व कायद्याचे पालन करणे बंधनकार राहोल

२८. खाजगी कर्मचाऱ्यांची वयोमर्यादा कमीत कमी १८ वर्ष व जास्तीत जास्त ४५ वर्ष राहील.

२९. खाजगी कर्मचाऱ्यांचे वाहनचालक पदाकरिता शिक्षण किमान इयत्ता दहावी पास असणे आवश्यक आहे.

३०. व्यसनाधीन गुन्हेगारांशी पार्श्वभूमी असणाऱ्या खाजगी कर्मचाऱ्यास नियुक्ती देता येणार नाही. खाजगी कर्मचारी नियुक्ती पूर्वी अशा कर्मचाऱ्यांची चरित्र पडताळणी करुन घेणे बंधनकारक राहील.

३१. सदरील कर्मचाऱ्यांना अपघात झाल्यास खर्चाची पूर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कर्मचाऱ्याकडून कार्यालयास / इतरांस नुकसान झाल्यास खर्चाची पूर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३२. वाहनचालक यांचा वाहनचालक परवाना असणे आवश्यक आहे

३३. कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी कंत्राट रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना असतील.

Jt. Charity Commissioner Pune

०२।०२

**धर्मादाय सह आयुक्त**
**पुणे विभाग पुणे**